**ठळक बातम्या**

- भारत आणि न्युझीलंडच्या आर्थिक प्रगतीकरता दोन्ही देशांनी एकमेकांशी तंत्रज्ञानाची देवाण घेवाण करणं गरजेचं असल्याचं न्यूझिलंडचे प्रधानमंत्री ख्रिस्टोफर लक्झन यांचं रायसीना संवादात प्रतिपादन

- भारत आणि न्यूझीलंड यांच्यात विविध क्षेत्रांमधल्या सहकार्याबाबत ५ करार

- महाराष्ट्राचं कर्ज आणि महसुली तूट सुरक्षित मर्यादेच्या आत असल्याचं अर्थमंत्री अजित पवार यांचं विधानसभेत स्पष्टीकरण, गरज संपलेल्या, द्विरुक्ती असलेल्या योजना बंद करण्याचं सूतोवाच.

- आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर अडकलेले वैज्ञानिक सुनीता विल्यम्स आणि बुच विलमोर उद्या रात्री पृथ्वीवर परतणार

**आणि**

- इंग्लंडमध्ये कबड्डी विश्वचषक स्पर्धेला प्रारंभ /भारताची विजयी सलामी

**<><><><><><>**

भारत आणि न्युझीलंडच्या आर्थिक प्रगतिकरता दोन्ही देशांनी एकमेकांशी तंत्रज्ञानाची देवाण घेवाण करणं गरजेचं असल्याचं मत न्यू झिलंडचे प्रधानमंत्री ख्रिस्टोफर लक्झन यांनी केलं आहे. रायसीना संवाद २०२५चं उद्घाटन आज नवी दिल्लीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि ख्रिस्तोफर लक्झन यांच्या हस्ते झालं. त्यानंतर ते बोलत होते.गेल्या २००

वर्षांपासून भारत आणि न्युझीलंडचे नागरिक उद्योग आणि संस्कृतीचं आदान प्रदान करत आहेत, आणि आजही विविध क्षेत्रात सहकार्य वृद्धीसाठी दोन्ही देश कार्यरत असल्याचं लक्झन यावेळी म्हणाले. औषध निर्मिती आणि यंत्रांसाठी आज भारत न्यु-झीलंडचा मोठा स्त्रोत आहे. तसंच पर्यटनासाठी न्यु-झीलंडच्या भूमीवर मोठ्या प्रमाणावर भारतीय पर्यटक येत असतात, असंही लक्झन म्हणाले. दोन्ही देशांमध्ये अतिशय सक्षम मनुष्यबळ आहे आणि परस्पर समृद्धीसाठी कार्यरत राहू असं ते म्हणाले. जगभरात अर्थकारणापेक्षा सुरक्षेला अधिक प्राधान्य दिलं जातं आहे. त्याचवेळी सार्वभौमिकता जपण्याला आम्ही प्राधान्य देऊ, असं त्यांनी सांगितलं.

परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांच्यासह विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते. लक्झन यांच्या पाच दिवसांच्या दौऱ्यादरम्यान बुधवारी ते मुंबईलाही भेट देणार आहेत.

<><><><><>

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात आज संरक्षण, शिक्षण, क्रीडा, फलोत्पादन आणि वनसंवर्धन या क्षेत्रां◌मधल्या सहकार्याबाबत पाच करार झाले. दोन्ही देशांच्या एईओ अर्थात अधिकृत व्यापाऱ्यांना मान्यता देणारा करारही यावेळी झाला.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि न्यूझीलंडचे प्रधानमंत्री ख्रिस्तोफर लक्झन यांनी आज नवी दिल्लीत विविध विषयांवर बहुआयामी चर्चा केली. द्वीपक्षिय संबंधांना अधिक दृढ करण्याबरोबरच संरक्षण आणि सुरक्षा भागीदारी अधिक मजबूत करण्याचा निर्णय दोघांनी घेतल्याचं मोदी यांनी सांगितलं.

कोणत्याही स्परूपातला दहशतवाद खपवून घेतला जाणार नाही असं मोदी यांनी यावेळी सांगितलं. न्यूझीलंडमधे काही समाजकंटकांकडून भारतविरोधी कारवाया सुरू असल्याबद्दल चिंता व्यक्त करताना ते बोलत होते.

**<><><><><><>**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात लोकशाही, कायद्याचे राज्य आणि लोकांचे परस्परांशी असलेलं मजबूत नातं यामधे खोलवर रुजलेल्या सामायिक मूल्यांवर आधारित दृढ आणि मित्रत्वाचे संबंध असल्याचं मत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी व्यक्त केलं. न्यूझीलंडचे प्रधानमंत्री ख्रिस्तोफर लक्झन आणि त्यांच्या शिष्टमंडळाचं राष्ट्रपती भवनात स्वागत केल्यानंतर त्या बोलत होत्या.

**<><><><><><>**

विद्यार्थ्यांना सध्या दिली जाणारी वार्षिक शिष्यवृत्ती वाढत्या महागाईमुळे त्यांच्या नियमित खर्चाची पूर्तता करण्यासाठी पुरेशी नाही, असं संसदीय स्थायी समितीनं नमूद केलं आहे. त्याबाबतचा अहवाल आज संसदेत मांडण्यात आला. पार्श्वभूमीवर, सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण विभाग, शिक्षण मंत्रालय आणि इतर संबंधितांसह विविध अभ्यासक्रमाच्या प्रत्येक विद्यार्थ्याला दिल्या जाणाऱ्या वार्षिक शिष्यवृत्ती रकमेचा आढावा घेण्याच्या सूचनाही या समितीनं दिल्या आहेत.

२०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी जवळपास १४ हजार १६५ कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद असूनही, फेब्रुवारी २०२५ पर्यंत शैक्षणिक शिष्यवृत्ती योजनांवर केवळ ३ हजार ४०३ पूर्णांक ५१ कोटी रुपये खर्च

केले असल्याबद्दल समितीनं विभागावर ताशेरे ओढले आहेत. वेळोवेळी त्याचं पुनरावलोकन करण्याची शिफारसही या अहवालात केली आहे.

**<><><><><><>**

राज्य विधान परिषदेच्या पोटनिवडणुकीसाठी पाच जागांकरता सहा उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. अर्ज दाखल करायच्या आजच्या शेवटच्या दिवशी भाजपाकडून संजय केणेकर, दादाराव केचे आणि संदीप जोशी यांनी आज आपले अर्ज दाखल केले. राष्ट्रवादी काँग्रेसचे संजय खोडके आणि शिवसेनेचे चंद्रकांत रघुवंशी यांनीही अर्ज भरला. तर अपक्ष उमेदवार उमेश म्हेत्रे यांनीही अर्ज दाखल केला आहे. ही निवडणूक २७ मार्च रोजी होणार आहे. मतमोजणी त्याच दिवशी संध्याकाळी ५ वाजता होईल.

**<><><><><><>**

मुंबईत होत असलेल्या वेव्हज अर्थात वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेनमेंट समिटच्या निमित्तानं ईस्पोर्ट्स स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. ईस्पोर्ट्स फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या सहकार्याने आयोजित केलेल्या या ऑनलाईन स्पर्धेत ई-फुटबॉल, WCC आणि BGMI या खेळांचे सामने राष्ट्रीय स्तरावर विविध टप्प्यात होणार आहेत. **अ**धिक माहितीकरता वेव्ह्ज इंडिया डॉट ओआरजी या संकेतस्थळाला भेट देऊ शकता.

वेव्हज ही जागतिक दृकश्राव्य मनोरंजन शिखर परिषद मुंबईत १ ते ४ मे या कालावधीत होणार आहे.

**<><><><><><>**

राज्याचं सध्याचं कर्ज सुरक्षित मर्यादेच्या आत आहे, असं उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी आज सांगितलं. ते विधानसभेत

अर्थसंकल्पावरच्या चर्चेला उत्तर देत होते. गेल्या १५ वर्षात राज्याच्या कर्जाचं स्थूल उत्पादनाशी प्रमाण १६ ते १९ टक्के आहे. २५ टक्क्यापर्यंत आपण कर्ज घेऊ शकतो. महाराष्ट्रासह देशातल्या केवळ ३ राज्यांचं कर्जाचं प्रमाण २० टक्क्यांपेक्षा कमी आहे. त्यामुळे सध्याच्या आर्थिक स्थितीबाबत निराधार आरोप करून राज्याची आर्थिक परिस्थिती खालावल्याचं खोटं चित्र रंगवू नका, असं आवाहन त्यांनी केलं. तुटीचा अर्थसंकल्प असल्याबद्दल विरोधकांनी केलेल्या टीकेलाही त्यांनी उत्तर दिलं. महसुली तूट आणि राजकोषीय तूटही मर्यादेत असल्याचं ते म्हणाले…

**होल्ड- बाईट - अजित पवार..(२८ सेकंद)**

विकसित भारताच्या निर्माणासाठी विकसित महाराष्ट्राचा रोडमॅप ठरवणारा हा अर्थसंकल्प असून महाराष्ट्राचा संतुलित विकास करण्याची क्षमता अर्थसंकल्पात असल्याचा विश्वास अजित पवार यांनी व्यक्त केला. आगामी ५ वर्षांचा विचार करून यंदाचा अर्थ संकल्प सादर केला आहे, असं ते म्हणाले. राज्याच्या आणि विविध समाज घटकांच्या हिताच्या योजना बंद करणार नाही. पण गरज संपलेल्या, द्विरुक्ती असलेल्या योजना सरकार बंद करेल. त्यासाठी निधी दिलेला नाही, असं त्यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><><>**

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर नऊ महिन्यांहून अधिक काळ अडकलेले सुनीता विल्यम्स आणि बुच विलमोर उद्या रात्री पृथ्वीवर परतणार आहेत. अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था नासाने ही माहिती दिली आहे. त्यांना स्पेसएक्स क्रू ड्रॅगन यानातून परत आणलं जाणार आहे. त्यांच्यासह

नासाचे अंतराळवीर निक हेग आणि रशियन अंतराळवीर ॲलेक्झांडर गोर्बुनोव्ह हे देखील ड्रॅगन कॅप्सुलवर परतणार आहेत.

<><><><><>

इंग्लंडमध्ये आजपासून कबड्डीची दुसरी विश्वचषक स्पर्धा सुरू झाली. भारताच्या पुरूष संघानं इटलीचा ६४-२२ असा पराभव करत आज विजयी सलामी दिली तर स्पर्धेतल्या पहिल्या सामन्यात इंग्लंडनं हंगेरीला १०१-२५ अशा गुणफरकानं पराभूत केलं. या स्पर्धेत सात दिवसांत ६० हून अधिक सामने होणार आहेत. पुरुषांची स्पर्धा ए आणि बी अशा समान गटात होत असून पुरुषांचे १० संघ आहेत. भारत बी गटात खेळत आहे. महिला डी आणि ई गटात खेळत असून भारताचा संघ ई गटात आहे.

<><><><><>

माजी केंद्रीय मंत्री देबेंद्र प्रधान यांचं नवी दिल्लीत निधन झालं. ते ८४ वर्षांचे होते.प्रधान यांनी माजी प्रधानमंत्री अटल बिहारी वाजपेयी यांच्या मंत्रिमंडळात केंद्रीय दळणवळण तसंच कृषी मंत्री म्हणून काम केलं होतं. त्यांनी ओदिशातल्या भारतीय जनता पार्टीचं अध्यक्षपदही भूषवलं होतं.

प्रधान यांच्या निधनाचं वृत्त आल्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्या पार्थिवाचं दर्शन घेत आदरांजली वाहिली. ओदिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण माझी, विरोधी पक्ष नेते नवीन पटनाईक यांनी समाजमाध्यमावर केलेल्या पोस्टमधून आदरांजली वाहिली.

<><><><><>

गेल्या महिन्यात घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित चलन फुगवट्याचा दर किंचित वाढून २ पूर्णांक ३८ शतांश टक्के झाला.

जानेवारीत हा दर २ पूर्णांक ३१ शतांश टक्के होता. वनस्पती तेल, चहा, कॉफी यासारख्या पदार्थांचे दर वाढल्यानं ही वाढ झाली असल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं आज प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीत म्हटलं आहे.

भाजीपाल्याचे दर मात्र गेल्या महिन्यात खाली आले. त्यामुळे खाद्यान्नासाठीचा हा दर ७ पूर्णांक ४७ शतांश टक्क्यावरुन ५ पूर्णांक ९४ शतांश टक्क्यापर्यंत घसरला. विशेषतः बटाट्याच्या दरात ७४ पूर्णांक २८ शतांश टक्क्यावरुन २७ पूर्णांक ५४ शतांश टक्के इतकी घसरण झाली. इधंन आणि उर्जा क्षेत्रातही लक्षणीय घसरण झाली.

**//<><><><><>//**